## प्रेस नोट

### जेष्ठ नागरीकाने कामावरून काढलेचे रागातून खुनाची सुपारी देणारा व सुपारी घेवून हत्येचा प्रयत्न करणारे आरोपी गुन्हे शाखा, युनिट २ कडून २४ तसांत जेरबंद

दि. ०३/०४/२०१९ रोजी राजतिलक लॉज, डवायर लेन कॅम्प पुणे चे मालक श्री रविंद्र शामकुमार अगरवाल, वय ७५ रा. सदर यांना जिवे मारण्याचे उद्देशाने हातोडयाने डोक्यावर मारुन जखमी केले बाबत लष्कर पोलीस स्टेशन गुरनं. २००/२०१९ भादवि क. ३०७,५०६(२),३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

दाखल गुन्हयाचे घटनास्थळी युनिट २, गुन्हे शाखा येथील स्टापने तातडीने भेट देवून मा. पोलीस उप आयुक्त श्री शिरीष सरदेशपांडे व सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे-१ श्री समीर शेख यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे पोनि गजानन पवार व युनिट २ कडील अधिकारी व कर्मचारी समांतर तपास करीत असताना पो शि राकेश खुणवे यांना सदर गुन्हयातील संशयीत आरोपी जव्हेरी बाजार, मुंबई या ठिकाणी जाणार असल्याची गोपनीय माहिती प्राप्त झाल्याने सदर आरोपीचा पाटालाग व शोधकामी युनिट २ कडील सपोनि जयवंत जाधव व स्टाफ तात्काळ वरिष्ठांच्या आदेशाने मुंबई येथे जावून बातमी मिळाले भागात आरोपींचा शोध घेतला असता ते मिळून आल्याने त्यांना स्टापचे मदतीने ताबेत घेवून त्यांची नाव व पत्ता विचारता त्यांनी आपले नाव पत्ते अनुक्रमे १)शरीफ आबेदअली शेख, वय २२, रा. जव्हेरी बाजार, तवा गल्ली, बिल्डींग नं. २३/२५, अब्दूलरमेमान स्ट्रीट, मुंबई, मूळ गाव मु. पो. जोलेश्वर, ता. गायगडा, जि. उत्तर २४ परगाना, पश्चिम बंगाल २)मकबुल निजामुल शेख, वय २१, रा. रा. जव्हेरी बाजार, तवा गल्ली , बिल्डींग नं. २३/२५, अब्दूलरमेमान स्ट्रीट, मुंबई, मूळ गाव मु. पो. पायगाचे, ता. बालाघाट, जि. हुगळी, रा. कलकत्ता असे सांगितले. त्यांना पुणे येथे आणून त्यांचेकडे अधिक चौकशी करता त्यांनी सदर लॉज मध्ये काम करणारा कामगार नामे अमरसिंग जोहरसिंग कुवर, वय ६०, रा. कस्तूरी चौक, पुणे मूळगाव मु.पो. सिध्देश्वर, ता. सापे, जि. अच्चाम, रा. नेपाळ याने राजतिलक लॉज चे मालक श्री रविंद्र शामकुमार अगरवाल हे त्यास वारवांर शिवीगाळ करतात, जेवायला देत नाही. जास्त काम करवून घेवून पगार कमी देतात तसेच काहिएक कारण न देता त्याला कामावरून काढून टाकले होते, त्यामुळे तो अगरवाल यांचेवर चिडून होता. त्याने राजतिलक लॉजवर सोन्याचे दुकानाबाहेरील माती गोळा करणारे व नेहमी राजतिलक लॉजवर उतरणारे आरोपींशी चांगली ओळख होती त्यातून त्याने आरोपींना अगरवाल यांची संपुर्ण माहिती देवून त्यांना मारणेबाबत विचारणा केली असता त्यांनी अगरवाल यांना मारण्याची तयारी दर्शविली असता अमरसिंग यांनी अगरवाल यांना मारलेस १५,०००/- रुपये देण्याचे कबूल करून ॲडव्हान्स म्हणून रोख रु. ५,०००/- दिले होते व त्यानंतर आरोपीने वर नमूद केले तारखेस वेळी व ठिकाणी अगरवाल यांचेवर हल्ला करून त्यांचे डोक्यात हातोडा मारून गंभीर जखमी करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला व तेथून पळून गेले होते. आरोपींबाबत काहिएक सुगावा नसताना कौशल्यपुर्ण तपास व अथक प्रयत्न करून आरोपींना जेरबंद करून गुन्ह्याची उकल करणेत यश आलेले आहे.

सदर गुन्हयाचे पुढील तपासकामी १) शरीफ आबेदअली शेख, वय २२, रा. जव्हेरी बाजार, तवा गल्ली, बिल्डींग नं. २३/२५, अब्दूलरमेमान स्ट्रीट, मुंबई, मूळ गाव मु. पो. जोलेश्वर,ता. गायगडा, जि. उत्तर २४ परगाना, रा. कलकत्ता २) मकबुल निजामुल शेख, वय २१, रा. रा. जव्हेरी बाजार, तवा गल्ली , बिल्डींग नं. २३/२५, अब्दूलरमेमान स्ट्रीट, मुंबई, मूळ गाव मु.पो. पायगाचे ,ता. बालाघाट, जि. हुगळी, रा. कलकत्ता व सदर लॉजमध्ये काम करणारा अमरसिंग जोहरसिंग कुवर, वय ६०, रा. कस्तूरी चौक, पुणे मूळगाव मु.पो. सिध्देश्वर, ता. सापे, जि. अच्चाम, रा. नेपाळ यांना रिपोर्टानेलष्कर पोलीस स्टेशनचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे श्री प्रदीप देशपांडे, मा. पोलीस उप आयुक्त, श्री शिरीष देशपांडे, मा. सहा पोलीस आयुक्त समीर शेख यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री गजानन पवार, सहा पोलीस निरीक्षक जयवंत जाधव, सपोफौ संजय दळवी, अनिल उसुलकर, पोना अतुल गायकवाड, चेतन गोरे, किशोर वग्गू, पोशि राकेश खुणवे यांचे पथकाने केली आहे.

**पत्नीचा खून करून मागील ५ महिन्यापासून फरार आरोपी गुन्हे शाखा, युनिट २ कडून जेरबंद**

दिनांक ०२/०४/२०१९ रोजी लोकसभा निवडणुकीचे संदर्भाने युनिट-२ हद्दीत मा. वरिष्ठांचे दिले सुचनांप्रमाणे गुन्हे प्रतिबंधक पेट्रोलिंगकामी सपोनि श्री जयवंत जाधव व स्टाप नेमलेला असताना पोहवा/दिनेश गडांकुश यांना त्यांचे गोपनीय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की लातूर येथून पत्नीचा खून करून आलेला आरोपी स्वारगेट परिसरातील कॅफे आयडील मध्ये काम करत आहे सदरची बातमी मिळताच सपोनि जाधव यांनी पोलीस निरीक्षक गजानन पवार यांना कळवून त्यांचे सुचनेप्रमाणे कॅफे आयडील हॉटेलमध्ये स्टापसह जावून चौकशी करून इसम नामे महेबुब हुसेन मुळजे वय २५ वर्ष रा. मु पो तुंगी बुद्रुक, ता औसा जि. लातूर यास ताबेत घेवून चौकशीकामी गुन्हे शाखा, युनिट-२ कार्यालय येथे आणून त्याचेकडे कौशल्यपुर्ण तपास व चौकशी केली असता त्याने सुमारे ०५ महिन्यापुर्वी त्याचे पत्नी नामे साबिया वय २२ हिचा तिचे अनैतिक संबंध असल्याचे कारणावरून झालेल्या भांडणामध्ये तिचे गळ्यावर चाकूने वार करून जीवे ठार मारले होते व तेव्हापासून तो पोलीसांना गुंगारा देवून पसार झाला होता. तेथून तो पुण्यात आलेवर तो कॅफे आयडील या हॉटेलमध्ये मोरीकामावर कामास लागलेला होता व तेथेच राहत होता. तो कोणत्याही प्रकारे त्याचे घरचे अगर ओळखीचे लोकांचे संपर्कात नव्हता. सदर बाबत औसा पोलीस ठाणे येथील प्रभारी अधिकारी सपोनि श्री जितेंद्र कदम यांचेकडे संपर्क साधून चौकशी केली असता त्यांनी आरोपीने सांगितले हकिकतीप्रमाणे त्याचेविरुध्द औसा पोलीस ठाणे येथे गुरनं २०९/२०१८ भादंवि सं कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल असल्याची माहिती दिली असता त्यांना नमूद आरोपीस ताबेत घेतलेबाबत कळवून त्यास ताबेत घेणेकामी लागलीच औसा पोलीस ठाणेचे सपोनि श्री जितेंद्र कदम व त्यांचा स्टाप रवाना होवून आज सकाळी ते पुणे येथे आले असता नमूद आरोपीची ओळख पटवून चौकशी करून नमूद आरोपीस वैद्यकीय तपासणी करून नमूद आरोपीस सपोनि जितेंद्र कदम व त्यांचे स्टापचे ताबेत देवून रवाना करणेत आलेले आहे.

सदरची कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे श्री प्रदीप देशपांडे, मा. पोलीस उप आयुक्त, श्री शिरीष देशपांडे, मा. सहा पोलीस आयुक्त समीर शेख यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री गजानन पवार, सहा पोलीस निरीक्षक जयवंत जाधव, सपोफौ अनिल उसुलकर, पो हवा दिनेश गडांकुश, पो ना किशोर वग्गू, पो शि चंद्रकांत महाजन, कादिर शेख, मितेश चोरमोले यांनी केलेली आहे.